

मथुरा फाउंडेशन संचालित

# चैतन्य

ज्येष्ठ नागरिक सहनिवास

सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था-संस्था नोंदणी क्र. ई-२६००१ (मुंबई)

मधुरा फाऊंडेशन संचालित

चैतन्य

ज्येष्ठ नागरिक सहनिवास

## 'चैतन्य' विषयी थोडेसे

निवृत्तीनंतरचे उर्वरित आयुष्य निसर्गाच्या सान्निध्यात एखाद्या गावात मजेत घालवावं असं सर्वांनाच वाटतं. नाही का ? पण यासाठी वीकएण्ड होमचा पर्याय भुरळ घालणारा असला, तरी खूपच खर्चिक आहे. आर्थिक सुबत्ता असलेल्या आपल्यापैकी काहींनी सुंदर वास्तु बांधली तरी तिची देखभाल करणे जिकिरीचे होते. वयाच्या विशी-पंचविशीपासून नोकरी व संसारातील जबाबदाऱ्या पार पाडल्यानंतर, आता मात्र प्रवासाचा शीण आणि कौटुंबिक नात्यांमधील ताणतणाव नकोत असे वाटते. याच जाणिवेतून

जांभुळपाडा या छोट्याशा गावात निवृत्तांसाठी एक नवीन सहनिवास बांधण्याची कल्पना सुचली.

जांभुळपाड्याला संपन्न अशी सांस्कृतिक परंपरा आहे. सिध्दलक्ष्मी गणपती, शंकर, महालक्ष्मी, राम, मारूती इत्यादिंची देवळे जागोजागी आहेत. गावात रामनवमी, देवीचा उत्सव, वेशीवरच्या ग्रामदेवतेची पूजा तसेच निसर्ग सान्निध्यात वर्षातून एकदा वनभोजन असते. दर संकष्टी चतुर्थीला गणपती अथर्वशीर्ष व रात्री एका कुटुंबातर्फे गावजेवणही असते. वर्षातून एकदा नोकरी, व्यवसायासाठी शहरात गेलेले गावकरी एकत्र येतात व हौशी, स्थानिक कलावंतांनी बसवलेलं नाटक सादर करतात. अशा रम्य परिसरात घरापासून दूर पण घरासारखे प्रेम, जिव्हाळा देणारे निवासस्थान असावे ही 'चैतन्य ज्येष्ठ नागरिक सहनिवास' उभे करण्यामागची प्रेरणा आहे.

जांभुळपाडा हे खोपोली - पाली (अष्टविनायकातील एक स्थान) रस्त्यावर अंबा नदीच्या काठी वसलेलं निसर्गरम्य गाव आहे. मुंबई व पुणे या दोन्ही शहरांपासून १०० ते ११० कि.मी. अंतरावर असल्यामुळे स्वतःच्या वाहनाने गेल्यास दोन तासांत व महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाच्या बसने गेल्यास अडीच ते तीन तासात

पोहोचता येते. त्यासाठी मुंबई सेंट्रल किंवा ठाणे आगारातून पालीला जाणारी बस किंवा शिवाजीनगर पुणे येथून रोहा येथे जाणारी बस घ्यावी. जांभुळपाडा गावाच्या मध्यवर्ती ठिकाणी (तलाठी कार्यालया समोर) 'चैतन्य' सहनिवास आहे. जवळच सरकारी प्राथमिक आरोग्य केंद्र आहे. औषधाचे दुकानही त्यालगतच आहे.

'चैतन्य' मध्ये टुमदार कौलारू घरांमध्ये १५ खोल्या निवासासाठी उपलब्ध आहेत. प्रत्येक खोलीला जोडून स्वतंत्र संडास, बाथरूम आहे. घराला प्रशस्त व्हरांडा आहे. एका खोलीत दोन निवासींची राहण्याची व्यवस्था आहे.



मधुरा फाऊंडेशन संचालित

# चैतन्य

ज्येष्ठ नागरिक सहनिवास

## निवासींना इथे खालील सोयी-सुविधा पुरविल्या जातील.

सकाळी : चहा किंवा कॉफी, नाश्ता, दूध

दुपारी : जेवण

सायंकाळी : चहा किंवा कॉफी आणि बिस्किट

रात्री : जेवण

१. आठवड्यातून एकदा व सणासुदीला मिष्टान्न असेल.

२. आंघोळीसाठी बाथरूममध्ये गार / गरम पाण्याच्या शॉवरची सोय आहे.

३. रोजचे कपडे धुवून दिले जातील.

४. वाचनासाठी ग्रंथालय आहे. तेथे दैनिक वर्तमानपत्रे, मासिके, व विविध विषयांवरची पुस्तके असतील.

५. मनोरंजनासाठी टी.व्ही. तसेच खेळण्यासाठी पत्ते, कॅरम इत्यादी उपलब्ध आहेत.




मथुरा फाऊंडेशन संचालित

# चैतन्य

ज्येष्ठ नागरिक सहनिवास


मु.पो. जांभुळपाडा, ता. सुधागड,
जि. रायगड, महाराष्ट्र - ४१० २०५.

संपर्क : सौ. लीना देवस्थळी, विश्वस्त, मथुरा फाऊंडेशन,
भ्रमणध्वनी : ९८२०२३३०७०
Email : chaitanyajambhulpada@gmail.com


वेळ : दुपारी ३.०० ते ५.००

देणगीदारास "८० जी" सवलत उपलब्ध आहे.